सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## देवेंद्र फडणवीस पंतप्रधान व्हावेत!

### विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली इच्छा; राजकीय चर्चांना उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई–** महाराष्ट्रासह देशातील राजकारणात मोठा उलटफेर होण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा असतानाच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना केंद्रात मोठं पद मिळणार असल्याची शक्यता आहे. दुसरीकडे फडणवीस हे पंतप्रधान व्हावेत. मराठी माणूस पंतप्रधानपदी बसणार असेल तर आनंद वाटेल,अशी विधानं विरोधकांकडून होत असल्यानं फडणवीस देशाचे नवे पंतप्रधान होणार असल्याच्या चर्चेला नव्यानं फोडणी मिळालीय.

गेल्या काही दिवसांपासून फडणवीस यांच्या दिल्लीतील वाऱ्या अचानक वाढल्या आहेत. त्यामागील कारण म्हणजे देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत एक मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवलीय. भाजपच्या सर्वात ताकदवर मानल्या जाणाऱ्या 'केंद्रीय संसदीय बोर्डावर' फडणवीस यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे.दुसरीकडे फडणवीस पंतप्रधान




होणार असल्याच्या चर्चांनी धुराळा उडालाय. देवेंद्र फडणवीस पंतप्रधान व्हावेत अशी इच्छा स्वपक्षातील नेत्यांपेक्षा विरोधातील नेत्यांना अधिक आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे गेले काही दिवसांपासून देवेंद्र फडणवीस पंतप्रधान होणार असून त्याबाबत हालचालींना वेग असल्याचा दावा करत आहेत.

देवेंद्र फडणवीसांवर विरोधक मुख्यमंत्री म्हणून टीका करत असले तरीही फडणवीसच त्यांच्या मनातले भावी पंतप्रधान आहेत. फडणवीस पंतप्रधान व्हावे अशी आमची इच्छा आहे असं विधान काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केलंय. तर दुसरीकडे फडणवीसांनी दिल्लीला जायची आवराआवरी सुरू केलीय.

ते आपल्या मर्जीतील नेत्यांना योग्य जागेवर बसवल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीकडे मार्गस्थ होतील, असं संजय राऊत म्हणालेत. संजय राऊत यांना भविष्यात उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून विधान परिषदेची संधी मिळेलच असे नाही, असा टोलाही नवनाथ बन यांनी लगावला. राऊत यांना पुन्हा महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय व्हावे लागेल, असा दावा करत त्यांनी सामना कार्यालयाचा उल्लेख करत बोचरी टीका केली. राऊत यांच्यावर वैयक्तिक स्वरूपाची टीका करताना बन यांनी त्यांच्या राजकीय भवितव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

#### ■ पीएम होण्याच्या का झाल्या सुरू?

देवेंद्र फडणवीस यांचे भाजपमधील वाढते वजन पाहता आणि राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्वाचा प्रभावामुळे २०२९ नंतर किंवा त्यापूर्वी केंद्रात त्यांची वर्णी लागू शकते असा अंदाज राजकीय विश्लेषक व माध्यमांद्वारे व्यक्त केले जात आहेत. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत झालेल्या सलग निवडणुकांमध्ये पक्षाला मिळवून दिलेल्या घवघवीत यशामुळे देवेंद्र फडणवीस यांचे भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वातील स्थान आणि महत्त्व कमालीचे वाढले आहे. सध्या ते भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

#### ■ संजय राऊतांनी दुकान आवरायला सुरुवात करावी – नवनाथ बन

ठाकरे गटावर टीका करताना नवनाथ बन म्हणाले, महाराष्ट्रातील जनतेने उबाठा गटाला आवरले आहे. या गटाला घरात बसवण्याचे काम जनतेने केले आहे. आता संजय राऊतांनी आपले दुकान आवरायला सुरुवात करावी. संजय राऊत यांच्या राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ २०२८ मध्ये संपणार असल्याचा संदर्भ देत बन यांनी त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीवरही भाष्य केले. २०२८ मध्ये कार्यकाळ संपल्यानंतर राऊत यांना पुन्हा राज्यसभेत जाता येणार नाही, असा दावा त्यांनी केला. २०२८ ला तुमची मुदत संपेल तेव्हा दिल्लीचा गाशा गुंडाळून तुम्हाला महाराष्ट्रात यावे लागेल, असे म्हणत बन यांनी राऊतांवर टीका केली.

## अमरावती स्त्री रुग्णालय अग्निकांड : चौकशीला वेग;

### आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत अमरावतीत दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती :** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (डछउण) लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीला आता वेग आला आहे. आरोग्य विभागाने घटनेमागील नेमकी कारणे आणि संभाव्य प्रशासकीय हलगर्जीपणाची चौकशी करण्यासाठी विशेष समिती गठीत केली आहे.या चौकशी समितीच्या प्रमुख तथा आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत आज अमरावतीत दाखल झाल्या.

अमरावतीत पोहोचताच त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक तथा प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार आणि वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत बैठकींचे सत्र सुरू केले आहे. या बैठकीत घटनेशी संबंधित विविध बाबींची माहिती घेतली जात असून, रुग्णालय प्रशासनाकडील कागदपत्रांचीही तपासणी केली जात आहे.विशेष म्हणजे, या अग्निकांडाच्या पार्श्वभूमीवर व्हेंटिलेटरमध्ये नेमका तांत्रिक बिघाड कसा झाला, त्यानंतर आग कशी भडकली आणि



त्यावेळी डछउण विभागात सुरक्षेच्या कोणत्या उपाययोजना कार्यरत होत्या, याचा तपास केला जात आहे.

त्याचबरोबर रुग्णालयाच्या फायर ऑडिटची मुदत संपत आलेली असताना त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली, याचीही चौकशी समिती पडताळणी करणार आहे.फायर ऑडिटसाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला होता का? सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक कामांमध्ये दिरंगाई झाली का? रुग्णालयातील अग्निसुरक्षा यंत्रणा आणि स्प्रिंकलर यंत्रणा घटनेच्या वेळी कार्यरत होती का? तसेच व्हेंटिलेटरच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असलेल्या संबंधित यंत्रणेने व तांत्रिक तपासणी केली होती का, यावरही समितीचा भर राहणार आहे.

दरम्यान, घटनेच्या वेळी प्रत्यक्ष परिस्थिती काय होती, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी कोणती पावले उचलली आणि बचावकार्यामध्ये काही त्रुटी राहिल्या का, याचीही माहिती घेतली जाणार आहे.उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल या संपूर्ण प्रकरणातील जबाबदारी निश्चित करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे चौकशीनंतर नेमक्या कोणत्या अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक यंत्रणा किंवा कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित होते आणि दोषींवर कोणती कारवाई केली जाते, याकडे आता अमरावतीसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## तुम्ही मनूचा अपमान का करताय? योगी आदित्यनाथ यांचा राहुल गांधींवर हल्लाबोल


### मनुस्मृतीबाबतच्या विधानावर टीका!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ रायबरेली –** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी यांच्या मनुस्मृतीवरील टीकेवरून त्यांच्यावर हल्लाबोल केला. राहुल गांधी भारताच्या परंपरेचा अपमान करून तरुणांना भडकवत असल्याचा आरोप योगी आदित्यनाथ यांनी केला. रायबरेली येथे ८७९ कोटी रुपयांच्या ३४६ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात योगी बोलत होते. याबद्दल सविस्तर वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

महाराष्ट्रातील विद्यार्थिनींशी संवाद साधताना राहुल गांधी यांनी शनिवारी 'मनुस्मृतीच्या मानसिकते'वर टीका केली होती. तसेच मुलींनी पितृसत्ताक व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवावा आणि महिलांनी स्वतःच्या आयुष्यावर स्वतःचा अधिकार ठेवावा, असे आवाहन केले होते.

तुमची मूल्ये भारताच्या परंपरांशी जुळत नसतील, तरीही तुम्ही सध्याच्या पिढीशी खेळू नये. त्याऐवजी, एका जबाबदार नेत्याप्रमाणे वागून उदाहरण बनाव. मनुस्मृतीवर विश्वास ठेवायचा किंवा नाही हा राहुल गांधींचा प्रश्न आहे, मात्र त्यांनी चुकीची विधाने करू नयेत,




असेही त्यांनी म्हटले.

योगी आदित्यनाथ यांनी मनुस्मृतीच्या संदर्भात अथर्ववेद, शतपथ ब्राह्मण, महाभारत आणि मत्स्य पुराण यांचा उल्लेख करत, मनुचा अपमान का करता? असा प्रश्न राहुल गांधींना उपस्थित केला. योगी आदित्यनाथ यांनी काँग्रेसवर देशाची आणि समाजाची विभागणी केल्याचा आरोप केला. काँग्रेसने राजकारणातून सामाजिक एकता कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा दावाही त्यांनी केला.

रायबरेलीला पूर्वी 'व्हीआयपी जिल्हा' आणि 'व्हीआयपी संसदीय मतदारसंघ' म्हटले जात होते, मात्र तरीही या भागाकडे दुर्लक्ष झाले, असा दावा योगी आदित्यनाथ यांनी केला. रायबरेली आणि अमेठीचा वापर केवळ मतपेढी म्हणून करण्यात आल्याचा आरोप त्यांनी राहुल गांधींवर केला. काँग्रेस आणि गांधी कुटुंबाने स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचा सन्मान केला नाही, असाही आरोप त्यांनी केला.योगी आदित्यनाथ यांनी मुली आणि व्यापाऱ्यांच्या सुरक्षेशी तडजोड करणाऱ्यांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण असल्याचं सांगितलं. त्यांच्यासाठी दोनच ठिकाणे आहेत, एकतर जेल किंवा नरक. तिसरे कोणतेही ठिकाण नाही, असा इशारा योगी आदित्यनाथ यांनी दिला.

## पुण्यानंतर राहुल गांधी मुंबई आणि नागपुरात

### नागपूरचा कार्यक्रम इतर ठिकाणच्या कार्यक्रमापेक्षा वेगळा राहणार

### संघाचे मुख्यालय आणि मुख्यमंत्री फडणवीसांच्या शहरात थेट राजकीय आव्हान

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५नागपूर:** काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील 'छात्रों की गूंज' कार्यक्रम चांगलाच चर्चेत आला. या कार्यक्रमाला विद्यार्थिनींची उपस्थितीती लक्षणिय होती. या कार्यक्रमाच्या आधी पुण्यात मोठा राडा झाल्याचे दिसून आले. पुण्यातील सीओईपी कॉलेजमध्ये काँग्रेस आणि एबीव्हीपीच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याने या परिसरात गोंधळ झाल्याची स्थिती निर्माण झाली होती. मात्र, त्यानंतरही राहूल गांधी यांचा कार्यक्रम यशस्वी झाल्याचे दिसून आले. यानंतर आता नागपूरमध्येही राहूल गांधी येणार असून 'छात्रों की गूंज' कार्यक्रम होणार आहे. नागपुरात या



कार्यक्रमाच्या तयारीबाबत चर्चा सुरू आहे. नागपूरचा कार्यक्रम इतर ठिकाणच्या कार्यक्रमापेक्षा वेगळा राहणार आहे .

पुण्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'छात्रों की गूंज' हा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आधारित संवाद कार्यक्रम लवकरच नागपुरात आणि मुंबईत होणार असल्याची माहिती आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी हा कार्यक्रम नागपूरमध्ये होणार असल्याची माहिती दिली. विरोधकांकडून पुणे येथे झालेल्या कार्यक्रमावर टीका होत असली, तरी काँग्रेस पक्षाकडून हा व्यवस्था परिवर्तनाचा व तरुणांना जोडणारा महत्त्वाचा कार्यक्रम असल्याचे सांगितले जात आहे. नागपुरात या कार्यक्रमाच्या तयारीबाबत चर्चा सुरू आहे. नागपूरचा कार्यक्रम इतर ठिकाणच्या कार्यक्रमापेक्षा वेगळा राहणारआहे .

रविवारी फडणवीस यांनी जेन झी सोबत कार्यक्रम घेतला. यावेळी त्यांनी राहूल गांधी यांच्या पुण्यातील कार्यक्रमावर टीका केली.

ते एकीकडे महिला स्वातंत्र्याची गोष्ट करतात आणि दुसरीकडे महिला आरक्षण विधेयकाला विरोध करतात असे फडणवीस म्हणाले होते. त्यानंतर आता राहूल गांधी यांचा कार्यक्रम नागपूरमध्येच होणार असल्याने संघ आणि भाजपसाठी हे थेट आवाहन ठरणार असल्याची चर्चा आहे.

## तुकाराम मुंढेंचा आता शाळांकडे मोर्चा

### जंक फूड' रोखण्यासाठी मुख्याध्यापकांना दिली 'ईट राइट स्कूल' जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती**

अन्न पदार्थातील भेसळ, अवैध गुटखा विक्री व औषध विक्रीतील गैरव्यवहार रोखण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेनंतर आता तुकाराम मुंढे आयुक्त असलेल्या अन्न व औषध प्रशासनाने शाळांकडे मोर्चा वळवला. विद्यार्थ्यांचे आरोग्य, पोषण आणि शाळांमधील अन्नाच्या सुरक्षिततेवर जनजागृती करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आणि जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यशाळा घेऊन एक हजार ८४७ मुख्याध्यापकांना धडे दिले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा मुद्दा लक्षात घेता शाळांच्या मुख्याध्यापकांवर विविध जबाबदारी देण्यात आली आहे.

'जंक फूड' हे विद्यार्थी आवडीने खात असतात. मात्र, 'जंग फूड'मध्ये पोषणतत्त्वाचा प्रामुख्याने अभाव आढळून येतो. हे कमी खाल्ल्यावर देखील शरीरात अतिरिक्त कॅलरी व चरबी जाते. हे पदार्थ तयार करताना अतिप्रक्रिया केली जात असल्याने शरीरासाठी ते अत्यंत घातक ठरतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यापासून दूर राहणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली.जास्त चरबी, साखर व मीठ असलेल्या अयोग्य आहाराचे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत




असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने कार्यशाळेत स्पष्ट केले. चिप्स, कँडी, कोल्डड्रिंक्स, बेकरी पदार्थ आणि तळलेले पदार्थ यांचा अतिरेक लठ्ठपणा, मधुमेह तसेच एकाग्रतेशी संबंधित समस्या निर्माण करू शकतो. यावर मुख्याध्यापकांना सविस्तर माहिती देण्यात आली. शाळेच्या परिसरापासून ५० मीटरच्या आत कोणत्याही प्रकारचे 'जंक फूड' अथवा जाहिरात करण्यास नियमानुसार मनाई असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शहरातील प्रभात किडस् येथे आयोजित कार्यशाळेला अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त दे. गो. वीर, प्रभात किडसचे संचालक डॉ. गजानन नारे, अन्न सुरक्षा अधिकारी प्र. नि. काळे, र. द्वा. साळवेकर व कि. ह. बोऱ्हाडे, जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी उपस्थित होते.

'ईट राइट स्कूल' उपक्रमांतर्गत शाळांमध्ये मध्यान्ह भोजनाची स्वच्छता राखणे, विद्यार्थ्यांच्या डब्यात ताजी फळे, उकळलेली कडधान्ये व पौष्टिक आहाराचा समावेश करण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. शाळांमधील उपाहारगृह चालकांनी अन्न सुरक्षा नियमांचे पालन करून आवश्यक परवाना व नोंदणी पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये निरोगी आहाराची संस्कृती रुजवून सुदृढ पिढी घडविण्यासाठी शाळांनी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

## 'केंद्रीय संसदीय बोर्डावर' फडणवीस यांची वर्णी लागणार ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५मुंबई –** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत आताची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत एक मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी मिळण्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. भाजपच्या सर्वात ताकदवर मानल्या जाणाऱ्या 'केंद्रीय संसदीय बोर्डावर' फडणवीस यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून फडणवीस यांच्या दिल्लीतील वाऱ्या अचानक वाढल्याच्या पार्श्वभूमीवर हा राजकीय निर्णय मानला जात आहे.महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत झालेल्या सलग निवडणुकांमध्ये पक्षाला मिळवून दिलेल्या घवघवीत यशामुळे देवेंद्र फडणवीस यांचे भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वातील स्थान आणि महत्त्व कमालीचे वाढले आहे. सध्या ते भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत.राष्ट्रीय पातळीवर पक्षाची संघटनात्मक बांधणी




करणे आणि निवडणुकांची अचूक रणनीती आखणे, ही फडणवीस यांची मोठी जमेची बाजू मानली जाते. त्यातच त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही (ठडड) पूर्ण पाठिंबा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.राष्ट्रीय पातळीवर संघटनात्मक आणि निवडणूक रणनीतीचा अनुभव ही फडणवीसांची जमेची बाजू असल्याचे राजकीय विश्लेषक सांगतात. फडणवीसांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचाही पाठिंबा असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## संपादकीय ......

# भाषेवरून वाद नको, संवाद हवा!

*भारतात कुठेही जाऊन आपल्या पोटापाण्यासाठी नोकरी किंवा व्यवसाय करण्याचे भारतातील सर्व नागरिकांना स्वातंत्र्य आहे, पण तिथे राहत असताना तिथल्या लोकांची भाषा जर आपण अवगत केली तर त्यांचाशी संवाद साधताना अधिक जवळीकता निर्माण होते. आपलेपणा वाढतो. सहअस्तित्व वाढीला लागते. बाहेरील प्रांतातून आलेला माणूस हा परका वाटणार नाही. एखादा परप्रांतातील माणूस जेव्हा आपल्याशी स्थानिक भाषेत संवाद साधतो, तेव्हा आपल्याला त्याच्याविषयी आपोआप आपलेपणा निर्माण होतो. त्याच्याविषयी कुतूहल वाटू लागते. बाहेरील प्रांतातील माणसाने स्थानिक भाषा शिकण्याचा प्रयत्न केला, तर स्थानिक आणि परप्रांतीय असा जो भेद निर्माण होतो आणि त्यातून वादाचे प्रसंग निर्माण होतात, ते होणार नाहीत. त्यामुळे भाषा हे वादाचे नव्हे तर संवादाचे माध्यम व्हायला हवे. महाराष्ट्र राज्याचे परिवहनमंत्री आणि शिवसेनेचे (शिंदे गटाचे) नेते प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्रात जे रिक्षा, टॅक्सी, ओला, उबेर चालक आहेत, त्यांना मराठी भाषा अवगत असणे सक्तीचे केले. त्यासाठी विशिष्ट मुदत दिली. इतकेच नव्हे तर त्या परप्रांतीय चालकांसाठी मराठी भाषा शिकवण्याचे वर्ग सुरू केले. ज्यांनी त्या कालावधीत मराठी भाषा शिकून घेतली नाही, त्यांच्यावर सरकारने कारवाई सुरू केली आहे. त्यांचे परवाने तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येत आहेत. त्यामुळे आता काही रिक्षाचालकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. कुर्ला, कांदिवली, अंधेरी या भागातील काही रिक्षाचालकांनी तीन दिवसाचे रिक्षा बंद आंदोलन सुरू केले आहे. त्यांनी रिक्षा रस्त्यावर उतरविल्या आहेत, पण प्रवाशांना ने-आण करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे रिक्षाची गरज असलेल्या लोकांचे वांदे होत आहेत.*

*रिक्षाचालकांनी मराठी भाषा शिकण्यासाठी आणखी सहा महिन्यांची मुदत मागितली आहे, पण गेली पंधरा-वीस वर्षे महाराष्ट्रात राहिल्यावर मराठी येत नाही, याविषयी आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तसे पाहू गेल्यास रिक्षा किंवा टॅक्सी चालकाशी प्रवाशांचे फारच जुजबी बोलणे होत असते. त्यामुळे त्याच्याशी खूप काही गप्पा गोष्टी होण्याचा प्रसंग फारच विरळा असतो. रिक्षा किंवा टॅक्सी चालकाला प्रवासी त्याला जायचे ठिकाण सांगतो. त्यानंतर त्या रिक्षा किंवा टॅक्सी चालकाच्या मनात तिकडे जायचे असेल, त्याला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असेल तर तो होकार देतो. अन्यथा सरळ नाही म्हणून सांगतो. त्यानंतर प्रवाशाला त्याच्यावर जबरदस्ती करता येत नाही. त्यानंतर अनेकदा प्रवाशांची कोंडी होते, नाईलाज होतो. रिक्षा किंवा टॅक्सीवाला ऐकत नसेल तर त्याच्या रिक्षाचा क्रमांक आम्हाला कळवा, असे पोलिसांचे म्हणणे असते. पण इतके धाडस कोण करणार, कारण त्यातून रिक्षावाल्याशी भांडण आणि प्रसंगी मारामारी होण्याची भीती असते. अशावेळी सगळ्या रिक्षावाल्यांची युती होते, त्यामुळे प्रवासी घाबरून असतात. तसेच सोबत बायका-मुले असतील तर कुणी रिक्षावाल्याच्या वादात पडत नाही. खरे तर रिक्षा-टॅक्सीवाल्यांना जो वाहन परवाना मिळतो तो लोकांच्या सेवेसाठी मिळालेला असतो, त्यामुळे त्याची रिक्षा किंवा टॅक्सी रिकामी असेल तर तो कुठलेही भाडे नाकारू शकत नाहीत, असा कायदाच आहे. पण कायद्याला रिक्षा आणि टॅक्सीवाले मानत नाहीत. कायदा दाखवण्याइतकी प्रवासीही हिंमत दाखवत नाहीत, कारण प्रवाशाला संघर्ष टाळायचा असतो. त्यामुळे प्रवासी शक्य तो रिक्षा-टॅक्सीवाल्याशी नेहमीच नरमाईची भूमिका घेत असतो, किंबहुना तशी त्याला घ्यावीच लागते. अन्यथा त्याचे गाडे अडून बसते. मुजोर रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी लोकांकडून अनेकदा केली जाते, सरकारही तशी आश्वासने देते, पण त्यानुसार फारसे काही होत नाही.*

*सध्या काही रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठी भाषेच्या मुद्द्यावर आक्रमक पवित्रा घेतलेला आहे. जे मराठी रिक्षावाले त्यांच्या आंदोलनात सहभागी न होता प्रवाशांना सेवा देत आहेत, त्यांना अमराठी रिक्षा चालकांकडून विरोध होत आहे. त्यातून संघर्ष निर्माण होत आहे. काही रिक्षाचालकांनी आम्ही हिंदी आणि भोजपुरी बोलू, पण मराठी बोलणार नाही, असा पवित्रा घेतला आहे. काही दिवसांपूर्वी एका रिक्षावाल्याने काही झाले तरी मराठी बोलणार नाही, अशी भूमिका घेऊन आपली रिक्षा रेल्वेत घुसवत असल्याचा एक फोटो सोशल मीडियावर प्रसारित झाला होता. अमराठी लोकांनी मराठी बोलणार नाही, या भूमिकेला आता राजकीय रंग चढू लागला आहे. त्यातून नेहमीप्रमाणे मराठी आणि अमराठी असा तणाव निर्माण होऊ लागला आहे. राज्यात सरकार महायुतीचे आहे, त्यातला भाजप थेट रिक्षावाल्यांविषयी फार कठोर भूमिका घेणार नाही, कारण तो राष्ट्रीय पक्ष आहे. त्यांना महाराष्ट्रातील आणि राष्ट्रीय पातळीवरही अमराठी लोकांना दुखवून चालणार नाही. दुसर्या बाजूला ज्या परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठी भाषा सक्तीचा निर्णय घेतला ते शिंदेंच्या शिवसेनेचे आहे. आता एकनाथ शिंदे यांना आपणच मुख्य शिवसेना आहोत, हे सिद्ध करायचे असल्यामुळे त्यांना शिवसेनेचा मराठी माणूस आणि मराठी भाषा हा विषय महत्त्वाचा वाटत आहे. भाजपची बाजू वरचढ होऊ नये, यासाठी शिंदेंना जागरूक राहणे महत्त्वाचे वाटत आहे. खरे तर महाराष्ट्रात सार्वजनिक सेवा देताना इथली मराठी भाषा लिहिता, वाचता येणे हा काही नवीन कायदा नाही. सरनाईक त्याची फक्त नव्याने अंमलबजावणी करत आहेत. या भाषेच्या वादात आता मनसेही उतरली आहे. मनसेचा मराठी पाट्यांचा विषय असाच अधूनमधून उसळी घेतो. खरे तर सर्वोच्च न्यायालयाने ज्या राज्यात तुम्ही व्यवसाय करता तिथल्या भाषेत दुकाने आणि आस्थापनांवर पाट्या लावायला हव्यात, असे व्यावसायिकांना स्पष्टपणे बजावले आहे. राज्यात दीर्घकाळ राहणार्या अमराठी लोकांना मराठी भाषा बोलण्याचा आग्रह सरकारने धरणे यात गैर काहीच नाही, पण त्यात संयमित सातत्य असायला हवे. कारण तूप खाऊन दोन दिवसात रूप येणार नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. सगळेच अमराठी रिक्षाचालक काही मराठी भाषेचे विरोधक नाहीत, पण जे विरोध करत आहेत, त्यांना विश्वासात घ्यावे लागेल. कारण भाषा ही वादासाठी नाही, तर संवादासाठी असते.*

# खोटे प्रमाणपत्र देऊन कोट्यवधींची कामे लाटली

## कंत्राटदारावर कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी**
अंजनगावसुर्जी नगरपरिषद प्रशासनाची दिशाभूल करून कथित बनावट अनुभव प्रमाणपत्राच्या आधारे सुमारे चार कोटी रुपयांची विकासकामे मिळवल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते गजानन विजेकर यांनी कंत्राटदारांवर केला आहे. याप्रकरणी चौकशी करून फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली. अंजनगावसुर्जी नगरपरिषद अंतर्गत २०२४ मध्ये विविध विकासकामांसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यापैकी सुमारे १३ कामे, अंदाजे चार कोटी रुपये किमतीची, एका कंत्राटदाराला देण्यात आल्याचे विजेकर यांनी सांगितले. निविदेच्या नियम व अटींनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. त्यानुसार खारोळे यांनी अनुभव प्रमाणपत्र सादर केले होते. मात्र, हे प्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार तत्कालीन मुख्याधिकार्‍यांकडे करण्यात आली होती. त्यावर ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप विजेकर यांनी केला. प्रमाणपत्राची सत्यता पडताळण्यासाठी विजेकर यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दर्यापूर कार्यालयाकडे माहिती मागवली. त्यावर उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दर्यापूर यांनी लेखी स्वरूपात संबंधित कार्यालयीन क्रमांक ३१५८ नुसार १५ ऑगस्ट २०२२ रोजी असे कोणतेही अनुभव प्रमाणपत्र कार्यालयाकडून देण्यात आले नसल्याचा आरोप विजेकर यांनी केला. या पत्राच्या आधारे कंत्राटदाराने सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र बनावट असल्याचा आरोप करीत विजेकर यांनी नगरपरिषद प्रशासनाने प्रकरणाची सखोल चौकशी करावी, संबंधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि नगरपरिषदेच्या कामांसाठी त्यांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी केली. या आरोप-प्रत्यारोपांनंतर अंजनगावसुर्जी नगरपरिषद प्रशासन याप्रकरणी काय भूमिका घेते आणि चौकशीनंतर कोणती कारवाई होते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# शिवणगाव फत्तेपूर येथे ग्रामसभा शांततेत संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ शिवणगाव फत्तेपूर**
ग्रामपंचायत शिवणगाव फत्तेपूर येथे आज प्रशासक श्री. धर्मराज रा. खडसे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली. ग्रामसभेमध्ये झथङ २०२४ प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल यादीचे वाचन करून चर्चा करण्यात आली. त्यानंतर उपस्थित ग्रामस्थांच्या बहुमताने सदर यादी मंजूर करण्यात आली.तसेच ग्रामसभेमध्ये गावातील विविध विकासकामे व इतर विषयांवर चर्चा करून आवश्यक त्या सूचना व निर्णय घेण्यात आले.ग्रामसभेचे संपूर्ण कामकाज ग्रामपंचायत अधिकारी श्री. विनोद खडसे यांनी पार पाडले. ग्रामसभा सुरळीत व शांततेत पार पडली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी नांदगाव पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी ग्रामसभेच्या ठिकाणी उपस्थित होते.ग्रामसभेला उपस्थित राहून सहकार्य केल्याबद्दल ग्रामस्थांचे ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने आभार मानण्यात आले.-

# राष्ट्रसंत विचारधारा एमएला यूजीसी मान्यता मिळावी

## नागपूर विद्यापीठाने तातडीने पाठपुरावा करावा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा** नागपूर येथील विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव दिले आहे, त्याच विद्यापीठातील त्यांच्याच विचारधारेवरील एम. ए. अभ्यासक्रमाला यूजीसी मान्यता नसणे ही खेदजनक बाब आहे. या अभ्यासक्रमाला तातडीने यूजीसी मान्यता मिळावी, अशी मागणी राष्ट्रसंतप्रेमींनी केली आहे. याबाबतचे निवेदन प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे यांना देण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंत विचारधारेवर आधारित एम. ए. अभ्यासक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यायचा आहे, पण यूजीसी मान्यता नसल्यामुळे पीएच.डी. सारख्या पुढील शिक्षणात अडचणी येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा कमी होत आहे. या प्रश्नी अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे, पण ठोस कार्यवाही झालेली नाही. यासंदर्भात राष्ट्रसंतप्रेमींच्या शिष्टमंडळाने प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे यांची भेट घेतली. यावेळी ज्येष्ठ प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरूळकर यांनी राष्ट्रसंतांच्या साहित्याचे दाखले देत सांगितले की, राष्ट्रसंतांचे साहित्य युवापिढी घडवणारे आहे. नैराश्यात असलेली पिढी या साहित्यातून प्रेरणा घेऊन स्वावलंबी जीवन जगू शकते. शिष्टमंडळात आचार्य वेरूळकर, प्रेमकुमार बोके, ज्ञानेश्वर रक्षक, हेमंत टाले, रवी मानव आदींचा समावेश होता.

### कागदपत्रेच नाहीत

शिष्टमंडळाने यूजीसी मान्यतेसाठी विद्यापीठाने केलेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे मागितली असता ती तत्काळ उपलब्ध होऊ शकली नाहीत. त्यामुळे विद्यापीठाने नेमकी काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा, अशी मागणी करण्यात आली. यूजीसी मान्यतेचा प्रश्न प्राधान्याने सोडवावा, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# पशुवैद्यकीय इमारत डॉक्टरांच्या प्रतीक्षेत

## लाखोंचा खर्च करून उभारलेली सुविधा वापराविना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मेळघाट**
मेळघाटातील चुरणी येथे पशुपालकांच्या सुविधेसाठी श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखान्याची नवीन इमारत उभारण्यात आली आहे. मात्र, नियमित पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने ही इमारत वापराविना पडून आहे. लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या या इमारतीचा उपयोग नेमका कधी होणार, असा सवाल पशुपालकांकडून उपस्थित केला जात आहे. चुरणी परिसरात गाय, म्हैस यांसह मोठ्या प्रमाणात पशुधन आहे. पावसाळ्यात वातावरणातील बदलामुळे जनावरांना विविध आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. अशा परिस्थितीत पशुवैद्यकीय डॉक्टरांची नियमित सेवा आवश्यक असताना चुरणी येथे बराच काळ डॉक्टर उपलब्ध नसल्याने पशुपालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनावर आजारी पडल्यास उपचारासाठी त्यांना दूरवरच्या ठिकाणी जावे लागते. वेळेत उपचार न मिळाल्यास जनावरांची प्रकृती गंभीर होण्याची भीती असून, दुर्गम व आदिवासी भागातील पशुपालकांना आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. चुरणी येथे श्रेणी-२ पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधण्यात आली आहे. मात्र, इमारत तयार असूनही नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने शासनाच्या निधीतून उभारलेली ही सुविधा प्रत्यक्षात पशुपालकांच्या सेवेत आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पशुधनाची नियमित तपासणी, लसीकरण, औषधोपचार तसेच आपत्कालीन पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होणे गरजेचे आहे. मात्र, डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे पशुपालक या मूलभूत सुविधांपासून वंचित राहत आहेत.

### डॉक्टरांची तातडीने नियुक्ती करा



चुरणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात कायमस्वरूपी डॉक्टरांची नियुक्ती करून नवीन इमारत तत्काळ सुरू करावी, अशी मागणी पशुपालकांनी केली आहे. पावसाळ्यात पशुधनाच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वी पशुवैद्यकीय विभागाने दखल घेऊन नियमित सेवा सुरू करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दर्यापूर येथे गुरुवारी शिवसेनेचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर-** दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील एका कथित वक्तव्यावरून आता राजकीय वातावरण तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बाजार समितीच्या एका संचालकाने शेतकरी व हमालांनी भगवा दुपट्टा घालू नका, अशा आशयाचे वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी बाजार समितीकडे तक्रार करण्यात आली असतानाही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. याच पार्श्वभूमीवर २७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी एक वाजता दर्यापूर बाजार समिती येथे शिवसेनेतर्फे ‘जाब विचारा’ आंदोलन करण्यात येणार असल्याची सूचना पोलिसांना देण्यात आली आहे. यासंदर्भात शिवसेनेचे नेते गोपाल अरबट यांनी दर्यापूरचे ठाणेदार यांना लेखी निवेदन देऊन आंदोलनाची माहिती दिली आहे. संबंधित वक्तव्याबाबत चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनातून केली जाणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या आरोपांबाबत बाजार समितीच्या संबंधित संचालकांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे २७ ऑगस्टच्या आंदोलनाकडे दर्यापूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# तात्पुरत्या व्यवस्थेवर शिक्षण विभागाचा कारभार



## चिखलदरा तालुक्यात शिक्षकांची १३४ पदे रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चिखलदरा-**
चिखलदरा तालुक्यात जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची तब्बल १३४ पदे रिक्त असल्याने शिक्षण विभागाचा कारभार तात्पुरत्या व्यवस्थेवर सुरू आहे. शिक्षकांच्या कमतरतेचा थेट परिणाम आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होण्याची शक्यता असून, नियमित शिक्षकांची नियुक्ती कधी होणार, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित केला जात आहे. शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी लवकरच पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पेसा क्षेत्रातील शिक्षक भरतीप्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे तालुक्यातील शाळांना आवश्यक शिक्षक उपलब्ध होण्याची अपेक्षा शिक्षण विभागाने व्यक्त केली आहे. दरम्यान, नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा परिषद शाळा भूतृम येथील एका शिक्षकाची तीन दिवस डोमी आणि तीन दिवस कुही येथील शाळेत शैक्षणिक कार्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, एकाच शिक्षकावर दोन शाळांची जबाबदारी सोपविण्याची वेळ शिक्षण विभागावर आल्याने ही व्यवस्था विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा कितपत पूर्ण करणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी करण्यात आलेली ही व्यवस्था केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असून, लवकरच नियमित शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याचे गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती चिखलदरा यांनी स्पष्ट केले आहे. शिक्षक भरतीप्रक्रिया लवकर पूर्ण करून दुर्गम भागातील शाळांमधील रिक्त पदे भरण्याची मागणी होत आहे.

# ‘हर हर महादेव’च्या जयघोषात धामणगाव शिवमय

## कौंडण्यपूर ते धामणगाव जटाधारी कावडयात्रा, खाटू श्यामबाबांचा देखावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५धा.रेल्वे**
पवित्र कौंडण्यपूर क्षेत्रातून भक्तिभावाने निघालेल्या श्री जटाधारी कावडयात्रेचे धामणगावरेल्वे नगरीत आगमन होताच भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. ढोल-ताशांचा गजर आणि ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने संपूर्ण शहर शिवमय झाले होते. कावडयात्रेतील आकर्षक देखावे पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यंदाच्या कावडयात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे यात्रेत साकारण्यात आलेले विविध देखावे. खाटू श्यामबाबा आणि संकटमोचन हनुमान यांचे आकर्षक देखावे उभारण्यात आले होते. तसेच सुशोभित ट्रॅक्टरवर साक्षात भोलेनाथांच्या रूपातील भव्य झांकी साकारण्यात आली होती. या देखाव्यांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. कावडधार्‍यांच्या सेवेसाठी शहरातील नागरिक तसेच विविध मंडळांनी ठिकठिकाणी व्यवस्था केली होती. कावडधार्‍यांचे स्वागत करून त्यांना फळांचे वाटप तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. नागरिकांनी श्रद्धेने कावडधार्‍यांचे पूजन व स्वागत केले. यात्रा शहरातून मार्गस्थ होत असताना कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी दत्तापूर पोलिस ठाण्याच्या वतीने चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# आरोग्यमंत्र्यांनी घेतली मृत शिशूच्या आई-वडिलांची भेट

## दोषींवर कायदेशीर कारवाईचे आश्वासन

### पालकांनी डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणाचा केला आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती** आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयातील एसएनआयसीयू विभागाची पाहणी करून संपूर्ण घटनेची माहिती घेतली. पाहणीनंतर त्यांनी मृत नवजात शिशूच्या आई-वडिलांची भेट घेतली. यावेळी पालकांनी आपल्या व्यथा आरोग्यमंत्र्यांसमोर मांडत डॉक्टर व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे बालकांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन आरोग्यमंत्र्यांनी दिले. तीन नवजात शिशूच्या दुर्दैवी मृत्यूमुळे प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी आक्रमक झाले होते. त्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयात धाव घेतली. आरोग्यमंत्री प्रकाश



आबिटकर रुग्णालयाची पाहणी करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर प्रहारचे वसू महाराज मृत शिशूच्या पालकांसह रुग्णालयाबाहेर त्यांची वाट पाहत बसले होते. आरोग्यमंत्र्यांनी एनआयसीयू विभागाची पाहणी केल्यानंतर रुग्णालयाबाहेर येत मृत शिशूच्या पालकांची भेट घेतली. यावेळी पालकांनी त्यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्याहलगर्जीपणामुळेच आपल्या बालकांचा मृत्यू झाल्याचा आरोप पालकांनी केला. तसेच या प्रकरणातील दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली.

# फायर ऑडिटकडे रुग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष

## ९० रुग्णालयांना नूतनीकरणाच्या सूचना

### महापालिकेच्या वारंवार नोटिसांनंतरही दखल नाही, रुग्णांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**
शहरातील रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने फायर ऑडिट आणि अग्निसुरक्षा प्रमाणपत्राला अत्यंत महत्त्व असताना तब्बल ९० रुग्णालयांच्या फायर ऑडिटची वैधता संपल्याची बाब समोर आली आहे. महापालिका प्रशासनाकडून संबंधित रुग्णालयांना फायर ऑडिटचे नूतनीकरण करण्यासाठी वारंवार सूचना देण्यात येत असतानाही काही रुग्णालय प्रशासनाकडून त्याची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे रुग्णालयांमध्ये सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, रुग्णांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करून मृत्यूचा सापळा तर तयार केला जात नाही ना? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.महापालिका हद्दीत सुमारे २४६ रुग्णालये असून, त्यापैकी सध्या १५६ रुग्णालयांच्या फायर ऑडिटची वैधता कायम आहे, तर तब्बल ९० रुग्णालयांना फायर ऑडिटचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. या यादीमध्ये शहरातील विविध खासगी रुग्णालयांसह आरोग्य सेवेशी संबंधित संस्थांचा समावेश आहे. विशेष म्हणजे शहरातील जिल्हा शासकीय रुग्णालय (इर्विन), जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालय यातील शासकीय रुग्णालयांचाही उल्लेख संबंधित आकडेवारीत करण्यात आला आहे.

रुग्णालयांमध्ये मोठ्या संख्येने रुग्ण, नवजात बालके, वृद्ध, गंभीर आजाराचे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांची ये-जा असते. अशा ठिकाणी आग लागल्यास परिस्थिती अत्यंत गंभीर होऊ शकते. त्यामुळे फायर ऑडिटच्या माध्यमातून अग्निशमन यंत्रणा, फायर अलार्म, अग्निशामक यंत्रे, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, विद्युत व्यवस्था तसेच इतर सुरक्षा उपाययोजनांची तपासणी केली जाते. मात्र, फायर ऑडिटची वैधता संपल्यानंतरही त्याचे नूतनीकरण न करणे हा रुग्णांच्या जीविताशी संबंधित गंभीर विषय ठरू शकतो.

#### नियम मोडणाऱ्यांवर कारवाईची गरज

महापालिकेने ९० रुग्णालयांना फायर ऑडिट नूतनीकरणाच्या सूचना दिल्यानंतरही त्यांनी त्याची पूर्तता केली नसेल, तर केवळ नोटिसा देऊन थांबण्याऐवजी नियमांनुसार कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. कारण रुग्णालयातील अग्निसुरक्षेचा प्रश्न हा केवळ प्रशासकीय कागदपत्रांचा विषय नसून थेट नागरिकांच्या जीविताशी संबंधित आहे. फायर ऑडिटची वैधता संपलेल्या ९० रुग्णालयांची तातडीने तपासणी करून त्यांच्याकडून नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी आणि आवश्यक अग्निसुरक्षा उपाययोजना नसलेल्या रुग्णालयांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयासारख्या दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता केवळ सूचना देऊन चालणार नाही.-

#### दुर्घटनेनंतर प्रश्न अधिक गंभीर

जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) नवजात शिशु अतिदक्षता विभागात घडलेल्या आगीच्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील रुग्णालयांच्या अग्निसुरक्षेचा प्रश्न अधिक ऐरणीवर आला आहे. अशा दुर्घटनांनंतरही जर काही रुग्णालयांनी फायर ऑडिटचे नूतनीकरण केले नसेल, तर प्रशासनाने याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा कार्यरत आहे की नाही?, फायर अलार्म सुरू आहेत की नाहीत?, आपत्कालीन मार्ग मोकळे आहेत की नाहीत ?, विद्युत यंत्रणा सुरक्षित आहे की नाही? आणि आग लागल्यास रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी आवश्यक व्यवस्था आहे की नाही? याची प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी होत आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधींकडून शाळांमधील सुविधांची पाहणी

## प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**
जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी गेल्या तीन दिवसांपासून जिल्ह्यातील शाळांची पाहणी सुरू केली आहे. विद्यार्थी सुरक्षा, स्वच्छता, पायाभूत सुविधा आणि इतर आवश्यक सोयी या चार प्रमुख बाबींवर त्यांनी विशेष भर दिला असून, संबंधित अधिकाऱ्यांना उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत.

गांधी यांनी सुरुवातीला भातकुली, चांदूरबाजार आणि अमरावती या तीन तालुक्यांतील शाळांची पाहणी केली. त्यानंतर सोमवारी त्यांनी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दाभा, जळू, माहुली चोर आणि धानोरा गुरव येथील शाळांना भेट दिली. या पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींवर बांधकाम आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या.

सीईओ गांधी यांची पहिली भेट चांदूर बाजार तालुक्यातील आसेगाव येथील जिल्हा परिषद शाळेला होती. येथे त्यांनी शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे, टीव्ही संच, विद्युत सुविधा, क्रीडांगण, क्रीडा साहित्य, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आणि शाळेच्या इमारतीची पाहणी केली. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

त्यानंतर त्यांनी पंचायत समिती भातकुली अंतर्गत पूर्णानगर येथील मुलांची व कन्यांची शाळा अशा दोन्ही ठिकाणी भेट दिली. किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यासोबतच प्रत्येक वर्गखोलीत दोन सीलिंग पंखे बसवण्याच्या सूचना दिल्या. पंचायत समिती अमरावती अंतर्गत जि.प. माध्यमिक उर्दू शाळा,



वलगाव येथेही त्यांनी चार प्रमुख निकषांच्या आधारे पाहणी केली. विशेषतः विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याची स्वच्छता व सुरक्षितता याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.जि.प. उच्च प्राथमिक डिजिटल उर्दू शाळा, नांदगाव पेठ येथे भेट देऊन गांधी यांनी शाळेच्या शैक्षणिक, भौतिक व क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेतला. मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधून शाळेच्या गरजा व उपलब्ध सुविधांची माहिती घेतली. शाळेची जागा मर्यादित असून नवीन बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे यावेळी निदर्शनास आले.कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वारापासून कार्यालयापर्यंत सुमारे १५० मीटरच्या रस्त्यावरून ये-जा करताना विद्यार्थ्यांना अडचणी येत असल्याने, तेथे पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता सुस्थितीत करण्या बाबत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. या पाहणी दौऱ्यावेळी अनुपस्थित राहिल्याबद्दल चांदूर बाजार आणि भातकुली येथील गटशिक्षण अधिकारी (बीईओ) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. इतर अधिकाऱ्यांना कामे केवळ कागदावर न ठेवता, ती प्रत्यक्ष पूर्णत्वास न्यावीत, असे बजावत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे स्पष्ट निर्देशही सीईओ गांधी यांनी दिले.

# दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी, पालकांचा आक्रोश

## गाडगेनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**
जिल्हा स्त्री रुग्णालयात तीन नवजात शिशूचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर संतप्त पालकांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणात दोषी डॉक्टरांसह संबंधित कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पालकांनी केली. पोलिसांनी पालकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रथम तीन स्वतंत्र आकस्मिक मृत्यूची नोंद करून प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. चौकशीत तथ्य समोर आल्यानंतर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

घटनेनंतर मृत शिशूचे पालक, नातेवाईक तसेच प्रहार संघटनेचे बदाधिकारी संतप्त झाले. त्यांनी बाडगेनगर पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित डॉक्टर आणि एनआयसीयूविभागातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी पालकांनी रुग्णालयातील कथित हलगर्जीपणाची माहिती पोलिसांना




दिली.पोलिसांनी पालकांचे म्हणणे सविस्तर ऐकून घेतले. त्यानंतर तीन मृत शिशूच्या मृत्यूबाबत तीन स्वतंत्र आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. या प्रकरणाचा तपास सुरू असून, चौकशीदरम्यान मृत्यूचे नेमके कारण आणि त्यासाठी कोण जबाबदार आहे, याचा तपास केला जाणार आहे. चौकशीत दोष आढळल्यास संबंधितांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार गाडगेनगर पोलीसांनी विविध मागनि चौकशीस प्रारंभ केला आहे.

# तांडा वस्ती निविदा १५ दिवसांपासून रखडल्या।

## सुशिक्षित बेरोजगार ठेकेदार आंदोलनाच्या तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नांदगाव खंडेश्वर-** नांदगाव खंडेश्वर पंचायत समिती क्षेत्रातील तांडा वस्ती विकास योजनेअंतर्गत सुमारे ३३ लाख रुपयांच्या विकास कामांसाठीची निविदा प्रक्रिया गेल्या १५ दिवसांपासून गटविकास अधिकारी कार्यालयात रखडली आहे. यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, सुशिक्षित बेरोजगार कंत्राटदारांनी आक्रमक पवित्रा घेत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर



यांच्यामार्फत ही ३३ लाख रुपयांची निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. मात्र, निविदा सादर होऊन १५ दिवस उलटले तरी ती अद्याप उघडण्यात आलेली नाही.सूत्रांच्या माहितीनुसार, या निविदेत तीव्र स्पर्धा झाल्यामुळे काम कमी दराने दिले जाईल, हे लक्षात आले आहे. त्यामुळे निविदा 'मॅनेज' करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. टेंडर मॅनेज होत नसल्यानेच निविदा उघडण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप आहे. यामुळे निविदा वेळेत न उघडल्यास मोठा आर्थिक घोटाळा होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

सुशिक्षित बेरोजगार ठेकेदार कमी दरात काम करण्यास तयार असतानाही त्यांना संधी नाकारली जात असल्याचा आरोप कंत्राटदारांनी केला आहे. या प्रकरणी काही कंत्राटदारांनी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांची भेट घेऊन लेखी तक्रारही दिली आहे.

कंत्राटदारांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, येत्या दोन दिवसांत या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण न झाल्यास गटविकास अधिकारी यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल.या प्रकरणाची तातडीने चौकशी करून पारदर्शकपणे निविदा प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी कंत्राटदारांसह नागरिकांमधून होत आहे.

# टेम्ब्रूसोंडा शाळेच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत चमक

## जिल्हा गुणवत्तायादीत विद्यार्थ्यांचे स्थान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५टेम्ब्रूसोंडा-** चिखलदरा तालुक्यातील टेम्ब्रूसोंडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या सहा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्तायादीत स्थान मिळवत शाळेच्या यशाची परंपरा कायम ठेवली. इयत्ता चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. इयत्ता चौथीतील खुशी अतुल खडके हिने जिल्हा गुणवत्तायादीत ३६ वा, नीरज संजय खडके याने ३७ वा, तर दीपाली केशव भुसूम हिने ४८ वा क्रमांक मिळविला. इयत्ता सातवीतील मीनाक्षी रमेश कास्देकर हिने ३४ वा, रूपाली सुनील वाघमारे हिने ३६ वा, तर सागर नारायण गायन याने १६२ वा क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मुख्याध्यापक व शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. मुख्याध्यापक पंकज वानखडे, इयत्ता चौथीचे वर्गशिक्षक अंकुश ज्ञानदेव खरे आणि इयत्ता सातवीच्या वर्गशिक्षिका प्रियंका ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी केली. तसेच ज्योत्स्ना देशमुख, यशवंत पात्रे, विघ्नेश खंडे, अमित भिसारे, चंचल नांदगावकर, दिया धमाने, विपीन राठोड व युक्ता चेटुले यांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद आहे. त्यांच्या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीची नवी प्रेरणा मिळाली आहे. विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# रक्षाबंधनासाठी टपाल विभाग सज्ज:रेल्वे स्थानकात अतिरिक्त काउंटर, नागरिकांची पसंती टपाल सेवेलाच

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२५अमरावती**
रक्षाबंधनाचा सण जवळ आल्याने भावंडांमधील प्रेमाचा धागा वेळेत पोहोचवण्यासाठी टपाल विभागाने तयारी केली आहे. वाढती गर्दी लक्षात घेता, ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी अमरावती रेल्वे स्थानकातील टपाल सेवा केंद्रात एक अतिरिक्त काउंटर उघडण्यात आले आहे. हे काउंटर आगामी २८ ऑगस्टपर्यंत सुरू राहील, अशी माहिती उपअभिलेख अधिकारी प्रकाश हागे यांनी दिली.सध्या टपाल मुख्यालयासह जिल्ह्यातील विविध टपाल कार्यालयांमध्ये राख्या पाठवण्यासाठी बुकिंग सुरू आहे, ज्यामुळे नागरिकांची गर्दी वाढली आहे. देशाच्या विविध भागांत आणि परदेशात राहणाऱ्या भावंडांना राखी वेळेत मिळावी यासाठी स्पीड पोस्ट, पार्सल, रजिस्टर्ड पोस्ट आणि आंतरराष्ट्रीय सेवांचा वापर केला जात आहे. राख्या सुरक्षितपणे पाठवण्यासाठी आकर्षक आणि विशेष राखी पाकिटेही उपलब्ध आहेत. ग्राहकांना पार्सलच्या सेवांसह आयटीपीएसची सुविधाही मिळत आहे, ज्यामुळे परदेशातील भावंडांना राखी पाठवणे सोपे झाले आहे.

सध्या दररोज हजाराहून अधिक पार्सल्स पाठवली जात आहेत.



आजच्या डिजिटल युगात व्हिडिओ कॉल, ऑनलाइन भेटवस्तू आणि सोशल मीडियावरून शुभेच्छा देता येत असल्या तरी, प्रत्यक्ष हाताने निवडलेली राखी टपालाद्वारे भावापर्यंत पोहोचवण्याची भावना आजही कायम आहे. परदेशात किंवा दुसऱ्या शहरात नोकरी-व्यवसायानिमित्त राहणाऱ्या भावंडांपर्यंत टपालाने पोहोचणारी राखी केवळ एक वस्तू नसून तो एक भावनिक संदेश ठरत आहे. राखीसोबत इतर भेटवस्तूही पाठवल्या जात आहेत. खाजगी कुरिअर किंवा ऑनलाइन पर्यायांपेक्षाही नागरिक टपाल सेवेलाच अधिक पसंती देत आहेत.काउंटरवर बुकिंग झाल्यापासून ते बारकोडिंग, मेल बॅग, सॉर्टिंग, वाहतूक, गंतव्य शहरातील प्रक्रिया, वितरण कार्यालय आणि पोस्टमनपर्यंतचा हा प्रवास एका राखीला तिच्या अंतिम ठिकाणी पोहोचवतो. जिल्ह्यातील ३५४ टपाल केंद्रांचे मोठे जाळे आणि त्यामागे काम करणारी टपाल यंत्रणा यात महत्त्वाची भूमिका बजावते. देशातील विविध शहरांपासून थेट परदेशापर्यंत राखी पोहोचवण्याची जबाबदारी या यंत्रणेवर असते. एका काउंटरवर बुक झालेली राखी भावाच्या हातापर्यंत पोहोचण्यापूर्वी अनेक टप्प्यांतून जाते, ज्यामुळे टपाल विभागाची मोठी यंत्रणा आणि कर्मचाऱ्यांचे अदृश्य श्रम या छोट्याशा धाग्यामागे दडलेले आहेत.

# पंतप्रधान मोदींशी संवाद साधणार पोटे पाटील महाविद्यालयाचे विद्यार्थी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
'विकसित भारत युवा कनेक्ट' या राष्ट्रीय उपक्रमासाठी अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची राज्यातील ३७ महाविद्यालयांमध्ये निवड झाली आहे. अमरावती जिल्ह्यातून निवड झालेले हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. त्यामुळे



महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याचे मानले जात आहे.गुरुवार, २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या कालावधीत महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता विद्यार्थी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्हर्चुअल संवाद साधणार आहेत. 'विकसित भारत २०४७'च्या संकल्पनेशी युवकांना जोडणे, युवक व धोरणकर्त्यांमध्ये संवाद निर्माण करणे आणि शासन, तंत्रज्ञान, उद्योजकता व सामाजिक परिवर्तनात युवकांचा सहभाग वाढविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यंदा 'व्यसनमुक्त युवा, विकसित भारत' या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला आहे.महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (छडड) अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, पंतप्रधानांशी संवाद साधण्याची संधी मिळणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# जिल्हा स्त्री रुग्णालयातील तीन बाळांच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी उद्यापासून

*विदर्भ प्रजासत्ताक*
*दि.२५अमरावती :*

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात व्हेंटिलेटरच्या स्फोटानंतर लागलेल्या आगीत तीन नवजात बाळांचा मृत्यू झाल्याच्या गंभीर घटनेची उच्चस्तरीय चौकशी आता वेगाने सुरू होणार आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेली उच्चस्तरीय समिती उद्या सकाळी दहा वाजता अमरावतीत दाखल होणार आहे.समिती जिल्हा स्त्री रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन घटनास्थळाची पाहणी करणार असून, आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, यासह रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला जाणार आहे. विशेषतः फायर




ऑडिटची स्थिती, अग्निसुरक्षा यंत्रणा, विद्युत व्यवस्थेतील संभाव्य त्रुटी आणि व्हेंटिलेटरच्या तांत्रिक स्थितीची तपासणी समितीकडून केली जाण्याची शक्यता आहे.घटना घडली त्यावेळी रुग्णालयात उपस्थित असलेल्या डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे जबाब समिती कडून नोंदवून घेतले जाणार आहेत. आग लागल्या नंतर बचावकार्य कशा पद्धतीने झाले, अग्निशमन यंत्रणा वेळेत कार्यरत होती का आणि रुग्णालय प्रशासनाकडून कोणत्या उपाय योजना करण्यात आल्या, याचा ही तपास केला जाणार आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर रुग्णालय प्रशासनाच्या कार्य पद्धती वरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळे समितीच्या चौकशी अहवाला कडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे .चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील आठ दिवसांत समिती आपला अहवाल शासनाकडे सादर करण्याची शक्यता आहे. या अहवालातून दुर्घटनेमागील नेमकी कारणे आणि या प्रकरणात दोषी कोण, याबाबत महत्त्वाचे निष्कर्ष समोर येण्याची शक्यता आहे.

### चौकशी समिती

आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे मुख्य अभियंते, एम्सचे वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असणार आहे. येत्या आठ दिवसात घटनेचा सखोल तपास करून प्रत्यक्ष जबाबदार असलेल्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. ही समिती समस्येच्या खोलवर जाऊन कारणे शोधणार आहे. व्हेंटिलेटर, वीज यंत्रणेतील दोष, फायर ऑडिट, तसेच अन्य अनियमितता यांची सखोल तपासणी करेल.

# फायर ऑडिटसाठी महिनाभर पाठपुरावा, तरी PWD ची उडवाउडवी!

## जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीच्या घटनेनंतर धक्कादायक खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालकांच्या आगीत झालेल्या मृत्यूच्या घटनेनंतर रुग्णालयातील अग्निसुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. फायर ऑडिटची मुदत संपत असल्याची जाणीव असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळेत पाहणी आणि कार्यवाही झाली नसल्याचा गंभीर आरोप रुग्णालय प्रशासनाने केला आहे.जिल्हा शल्य चिकित्सक तथा प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार यांनी याबाबत संताप व्यक्त केला. फायर ऑडिटची मुदत संपत असल्याने महिनाभरापूर्वीपासूनच बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता, असे त्यांनी स्पष्ट केले. यासाठी केवळ पत्रव्यवहारच नव्हे, तर दूरध्वनीवरूनही संबंधित अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधण्यात आला होता, असे पवार यांनी सांगितले.रुग्णालयातील फायर यंत्रणेची




प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने अहवाल द्यावा, अशी विनंती आरोग्य विभागाकडून करण्यात आली होती. मात्र, झथऊकडून आरोग्य विभागाला सातत्याने उडवाउडवीची उत्तरे मिळत होती, असा गंभीर दावा डॉ. पवार यांनी केला.दरम्यान, रुग्णालयातील आगीनंतर फायर सेफ्टी यंत्रणा, स्प्रिंकलर आणि अग्निसुरक्षा उपाययोजनांबाबत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे फायर ऑडिट वेळेत का झाले नाही, आरोग्य विभागाच्या पाठपुराव्यानंतरही झथऊने तत्काळ कारवाई का केली नाही आणि संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष का केले, याची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.तीन नवजात बालकांचा जीव गेल्यानंतरही यंत्रणांची जबाबदारी निश्चित होणार का? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत असून, फायर ऑडिट प्रकरणात नेमकी दिरंगाई कुणाची होती, हे चौकशीतून स्पष्ट होणे गरजेचे आहे.

# एल-निनोच्या सावटात अमरावतीतील ३७० गावांना पाणीटंचाईची झळ

## १२.५७ कोटींचा संभाव्य प्लॅन तयार, नळ योजनांच्या दुरुस्तीवर सर्वाधिक भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती-** यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे पावसाची तुट असल्याने ग्रामीण भागात आताच पाणीटंचाईचे सावट आहे. जुलै ते या टंचाई निर्माण सप्टेंबर २०२६ कालावधीत तब्बल ३७० गावे व वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची होण्याची शक्यता आहे. या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासनाने ३८४ उपाययोजनांचा कृती आराखडा तयार केला असून, यावर १२.५७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर



यांनी या पार्श्वभूमीवर बैठक घेऊन जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला प्रस्तावित आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी कृती आराखडा तयार करून विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्या उन्हाळ्यातील पाणीटंचाईचा सामना करण्यास पर्याय ठरणार आराखड्यात आहेत. प्रस्तावित नळ योजनांची विशेष दुरुस्ती आणि खासगी विहिरी अधिग्रहणावर भर देण्यात आला आहे. जिल्ह्यातील १५० गावांमध्ये नळ योजनांच्या दुरुस्तीसाठी १८२.५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच विहिरींमधील पाणीसाठा घटल्याने १३३ गावांमध्ये १३६ खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात येणार आहे.

### मेळघाटात सर्वाधिक झळ

पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका धारणी आणि चिखलदरा या तालुक्यांना बसणार आहे. चिखलदरा तालुक्यात ५८ गावांमध्ये १०४ उपाययोजना प्रस्तावित असून त्यासाठी २२८.७४ लाख रुपये, तर धारणी तालुक्यात ३८ गावांमध्ये ३८ उपाययोजनांसाठी २६७.२० लाख रुपयांचा निधी प्रस्तावित आहे. याशिवाय वरुड (६३ गावे, २३२.५० लाख) आणि तिवसा (२५ गावे, १४०.४८ लाख) या तालुक्यांमध्येही परिस्थिती गंभीर राहण्याची शक्यता आहे.

### पाणीटंचाईची संभाव्य स्थिती

प्रभावित गावे/वाड्या – ३७०
एकूण उपाययोजना – ३८४
प्रस्तावित खर्च – १२.५७ कोटी
टंचाईचा कालावधी – जुलै ते सप्टेंबर

### टँकरने पुरवठा – १९ गावे

१९ गावांवर टँकरने पाणीपुरवठ्याची वेळ येणार आहे. यासाठी ३८ लाखांची, तर ४१ गावांमध्ये विहिरी खोल करणे व गाळ काढण्याच्या ४२ कामांसाठी १०९ लाख रुपये खर्च केले जातील.

### प्रस्तावित उपाययोजना आणि खर्च

नळ योजना दुरुस्ती – १५० कामे (१८२.५० लाख)
खासगी विहिरी अधिग्रहण – १३६ विहिरी (७२.०२ लाख)
विहिरी खोल करणे – ४२ कामे (१०९ लाख)
नवीन विंधन विहिरी – २५ (३२ लाख)
स्रोत बळकटीकरण – १२ कामे (२४ लाख)

# शोकमग्न वातावरणात भाजपा दहीहंडी करणार नाही !

## जखमी व मृत अर्भकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करणार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

अमरावती मध्ये हृदय पिळवटून टाकणारी अतिशय दुःखद घटना घडली आहे. केवळ अमरावतीच नव्हे तर सर्वत्र या प्रकरणाची हळहळ आहे. पूर्वीच्या डफरीन नावे प्रचलित असलेल्या जिल्हा महिला रुग्णालयातील नवजात अर्भकांच्या आयसीयू ला लागलेल्या आगेत तीन अर्भकांचा मृत्यू आणि सहा नवजात बालके जखमी होण्याची घटना हृदय पिळवटून टाकणारी आणि अत्यंत दुर्दैवी आहे. या बाळांच्या माता पित्यांचा, आप्तांचा आक्रोश न पाहवणारा आहे.

ही घटना ताजी असताना कुठल्याही प्रकारचा जल्लोष करणे उचित वाटत नसल्याने भाजपा अमरावतीच्या वतीने ठरवण्यात आलेली दहीहंडी रद्द करण्याचा निर्णय आम्ही घेत आहोत.भाजपा अमरावतीच्या वतीने रविवार ६ सप्टेंबर २०२६ रोजी राजकमल चौकात अभूतपूर्व दहीहंडीचे आयोजन केले होते. या तरुणाईच्या उत्सवाची पूर्ण तयारी झाली होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, नवनियुक्त राष्ट्रीय महासचिव व माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणीराज्यातील मंत्री महोदय आकाश फुंडकर, प्रा. अशोक उईके, पंकज भोयर प्रामुख्याने उपस्थित राहणार होते. धुरंदर फेम रणबीर सिंग, छावा फेम विकी कौशल, अभिनेत्री अनन्या पांडे हे सिनेस्टार आवर्जून उपस्थित राहणार होते. दोन क्रिकेटपटू देखील येण्याच्या तयारीत होते. मात्र, श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दोन आठवडे आधी घडलेल्या अनुचित घटनेने अमरावती शोकसागरात बुडाले आहे. एकीकडे दुःखद व दुर्दैवी प्रसंग घडलेला असताना दहीहंडी फोडणे ही परंपरा असली तरी या निमित्त होणारा जल्लोष व आनंदोत्सव करणे संवेदनशील मनाला न पटणारे आहे.

म्हणून भाजपा ने दहीहंडी कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.दहीहंडी रद्द करून जे बाळ जखमी आहेत, त्यांच्या योग्य उपचारासाठी आर्थिक मदत आणि ज्या बाळांनी जीव गमावला त्यांचे जीव आपण परत आणू शकत नसलो तरी सांत्वन म्हणून त्यांच्या कुटुंबियांना फुल नव्हे फुलांची पाकळी म्हणून आर्थिक मदत करण्याचा निर्णय भाजपाच्या वतीने घेण्यात आला आहे. शासन आपल्या स्तरावर कारवाई करेलच पण भाजपा संघटन म्हणून भाजपाचे जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार व पदाधिकारी तात्काळ सर्वांची भेट घेऊन सांत्वन करणार आहेत.

पुढल्या वर्षी भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य दहीहंडी आयोजित केली जाईल.

# साखर व्यापाऱ्यांना केंद्राचा दणका; ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साठ्यावर बंधने

## मिळालेला साठा ३० दिवसांत विक्री करावा लागेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती-** बाजारातील साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि संभाव्य तुटवडा रोखण्यासाठी केंद्र सरकारने साखर व्यापाऱ्यांवर स्टॉक लिमिट लागू केली आहे. १ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर या कालावधीसाठी हे आदेश लागू राहतील. यानुसार, जिल्ह्यातील सर्व साखर व्यापाऱ्यांना आणि डीलर्सना आता कमाल ४,००० क्विंटलपेक्षा जास्त साखरेचा साठा ठेवता येणार नाही, शिवाय मिळालेला साठा ३० दिवसांत विक्री करावा लागेल.केंद्र शासनाच्या ग्राहक संरक्षण, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली. जिल्ह्यातील सर्व घाऊक व किरकोळ साखर व्यापाऱ्यांना केंद्रीय अन्नधान्य पोर्टलवर तातडीने नोंदणी करणे अनिवार्य



केले आहे. व्यापाऱ्यांना दर शुक्रवारी साखरेच्या साठ्याची अद्ययावत माहिती या पोर्टलवर नोंदवावी लागेल.

शासकीय धान्य साठा किंवा सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत (पीडीएस) रास्त भाव दुकानांमधून वाटप होणाऱ्या साखरेला या नियमातून सूट देण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन आणि पुरवठा विभागाकडून या नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. व्यापाऱ्यांनी चुकीची माहिती दिल्यास किंवा साठा लपवल्यास 'अत्यावश्यक वस्तू कायदा, १९५५' अंतर्गत कारवाई केली जाणार आहे. साठेबाजी करून बाजारात साखरेचे भाव वाढवणाऱ्या व्यापाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. प्रत्यक्ष साठ्याची वेळोवेळी तपासणी करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत.

### रेशन दुकानांना नियमातून सूट !


हा नियम शासकीय साठा आणि सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत (पीडीएस) रेशन दुकानांमधून वाटप करण्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या साखरेच्या साठ्याला लागू असणार नाही. रेशनवरील साखरेचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी ही सूट देण्यात आली आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे बाजारपेठेत साखरेचा पुरेसा पुरवठा उपलब्ध राहील आणि ऐन सणासुदीच्या काळात साखरेचे भाव नियंत्रणात राहण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

या अनुषंगाने साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी पाहणी करण्याचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहे. तसेच व्यापाऱ्यांनी पोर्टलवर नोंदणी करून आपले परवाने व स्टॉक अपडेट ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. – **प्रज्वल पाथरे,** जिल्हा पुरवठा अधिकारी

# मेंढपाळ बांधवांसाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकूळे यांच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण निर्णय

## मेंढपाळ धनगर विकास मंच च्या प्रदीर्घ लढ्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती-** महाराष्ट्रातील मेंढपाळ बांधवांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नावर राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पद्मश्री डॉक्टर विकास महात्मे यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या मेंढपाळ धनगर विकास मंच च्या प्रदीर्घ संघर्षाचे फलित झाले आहे.मेंढपाळ धनगर विकास मंचच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष संतोष महात्मे यांनी वेळोवेळी याबाबतीत शासनाकडे आंदोलन, मोर्चे, बैठकी इत्यादी माध्यमातून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. पंधरा वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासात विविध पातळीवर अभ्यासपूर्ण मांडणी केलेली होती. वनविभागाच्या जाचक अटी व त्यावरील उपाय योजना करिता प्रयत्न सुरू होते. याच अनुषंगाने अर्धबंदिस्त मेंढीपालन प्रकल्प हा अभ्यासपूर्ण प्रस्ताव शासनास दिलेला होता. अमरावती जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय नामदार चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या समक्ष अमरावती जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर अर्धबंदिस्त मेंढी पालन प्रकल्प सुरू करण्याबाबत मागणी करण्यात आली होती. त्या



प्रस्तावाचा अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी संपूर्ण महाराष्ट्रात अर्धबंदिस्त मेंढी पालन प्रकल्प राबविण्याच्या सूचना या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेली आहे. अर्धबंदिस्त मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी राजे यशवंतराव होळकर महामेष योजना व जिल्हास्तरीय योजनांचा समन्वय करून आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वन विभागाने जून ते सप्टेंबर या खरीप हंगामात उपलब्ध वनक्षेत्रात मेंढी चराईस परवानगी देण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे.पूर्वीच्या मेंढी चराई जमाबंदी अहवालानुसार उपलब्ध असलेल्या २१ वन विभागांमध्ये निश्चित वनक्षेत्रावर ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार चराईस परवानगी देण्यात येणार आहे. तसेच चराईसाठी वनक्षेत्र उपलब्ध नसलेल्या २७ वन विभागांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार उपलब्ध होणाऱ्या वनक्षेत्रात मर्यादित स्वरूपात चराईस परवानगी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय मेंढपाळ बांधवांना पावसाळ्यात चराईसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी गायरान, ई क्लास, झुडपी तसेच इतर पडीक शासकीय जमिनी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

# गोमाता संवर्धन आणि राष्ट्रभक्तीचा संदेश देत धामणगाव रेल्वेतून सायकल यात्रा रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** 'गोमाता को राष्ट्रमाता' हा सन्मान मिळवून देण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली भव्य 'चलो रामदेवरा' सायकल यात्रा आज, २५ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता धामणगाव रेल्वे येथून राजस्थानमधील श्री रामदेवरा (रूणीचा धाम) कडे रवाना झाली. श्री रामदेव बाबा प्राचीन मंदिर, भगतसिंग चौक येथून या सायकल यात्रेला सुरुवात झाली. 'सायकल चालवा, आरोग्य सुधारा; गोसेवा करा, पुण्य कमवा' तसेच 'भक्ती, सेवा व राष्ट्रसेवा' या संकल्पनेतून



या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सायकल यात्रा महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातून मार्गक्रमण करत राजस्थानमधील प्रसिद्ध श्री रामदेवरा येथे पोहोचणार आहे. गोमाता संवर्धन, गोसेवा आणि राष्ट्रभक्तीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या यात्रेचे नियोजन पूनमचंद पंचारिया, लोकेश उपाध्याय, नवल उपाध्याय, करण उपाध्याय आणि संतोष शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यात्रेत सहभागी सायकलपटू आणि भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. गोमाता संवर्धनाचा संदेश जनमानसात पोहोचविण्यासोबतच आरोग्य, भक्ती, सेवा आणि राष्ट्रसेवेची भावना जागृत करण्याचा संदेश या सायकल यात्रेतून देण्यात येत आहे.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :